**राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई**

**<u>देशांतर्गत/परदेश अभ्यास दौऱ्यांसाठी टूर कंपन्यांची नामिका (Empanelment) तयार करण्याबाबत</u>**

राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेमार्फत महाराष्ट्र विधिमंडळाच्या मा.पीठासीन अधिकारी व मा.सदस्यांसाठी देशांतर्गत व परदेश अभ्यासदौरे/परिषदा आयोजित करण्यात येतात. तसेच महाराष्ट्र विधानमंडळाच्या विविध समित्यांचे देखील देशांतर्गत दौरे आयोजित केले जातात. सदर दौऱ्यांमध्ये दोन्ही सभागृहातील सन्मा. सदस्यांचा समावेश असतो. या अभ्यास दौऱ्यासाठी मुंबई महानगर क्षेत्रातील अनुभवी टूर कंपन्यांची नामिका (Empanelment) तयार करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

पात्रतेचे निकष :

१. टूर कंपनी भारत सरकार / राज्य सरकारकडे अधिकृतरित्या नोंदणीकृत असावी.

२. कंपनीचे मुख्य कार्यालय मुंबई महानगर क्षेत्रात असणे आवश्यक आहे.

३. सदरहू कंपन्यांना आंतरराष्ट्रीय अभ्यास दौरे आयोजित करण्यासंदर्भातील ७ वर्षांहून अधिक कालावधीचा अनुभव असावा.

४. अर्ज करतेवेळी कंपनीकडे शासकीय, संसदीय, मंत्रालयीन, स्वायत्त संस्था किंवा PSU यांचे परदेश दौरे आयोजित करण्यासंदर्भातील कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव असावा.

५. कंपनीची वार्षिक उलाढाल ₹ १५ कोटींपेक्षा अधिक असावी. गत तीन वित्तीय वर्षांचे लेखा परिक्षण केलेले आर्थिक विवरण पत्र अर्जासोबत जोडावे.

६. विधानमंडळ सचिवालयाचे कामकाज शासकीय पध्दतीने करण्यात येत असल्यामुळे देयक अदा करताना संपूर्ण विहित कार्यपध्दती राबवून अंतिम देयक अदा करण्यास ठराविक कालावधी लागण्याची शक्यता असते. सदर शक्यता गृहीत धरुन कंपनीची दौरा आयोजित करतानाची धारण क्षमता (Holding Capacity) रुपये ३ कोटीपेक्षा अधिक असावी.

७. कंपनी कोणत्याही शासकीय संस्थेकडून काळ्या यादीत टाकलेली नसावी. तसेच कंपनी अथवा कंपनीचे पदाधिकारी यांचे विरुद्ध कोणत्याही स्वरुपाची फौजदारी कारवाई प्रलंबित नसावी.

८. व्हिसा, देशांतर्गत व परदेशातील विमान तिकीट, निवास व्यवस्था, स्थानिक वाहतूक, परदेशातील संसदीय संस्थांना भेटी आयोजित करणे याबाबी हाताळण्याचा अनुभव असावा.

९. नामिकेची वैधता ३ वर्षे इतकी राहील. तथापि, सदर मुदत वाढविण्याचा अथवा कमी करण्याचा अधिकार या सचिवालयाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

१०. नामिकेवर निवड म्हणजे दौऱ्यासंदर्भातील काम निश्चित स्वरुपात दिले जाईल असा त्याचा अर्थ होणार नाही.

११. एखाद्या दौऱ्याकरिता नामिकेवरील कंपनीची नियुक्ती करताना कंपनीने त्यावेळी सादर केलेले दर विचारात घेताना यासोबत दौऱ्यादरम्यान कंपनीकडून दिल्या जाणाऱ्या इतर सुविधा, त्यांचा दर्जा व अनुभव विचारात घेतला जाईल.

१२. कंपनीने पूर्वी आयोजित केलेल्या दौऱ्याबाबत काही तक्रारी असल्यास त्यासंदर्भात स्वयं-घोषणापत्राद्वारे (Self declaration form) त्या जाहीर कराव्यात.

१३. दौऱ्यांमध्ये मा.पीठासीन अधिकारी, मा.मंत्री तसेच मा.सदस्य यासारख्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचा समावेश असल्याने त्यांच्या कार्यक्रमात ऐनवेळी बदल झाल्यास त्याप्रमाणे नियोजन करण्याची क्षमता असावी. दौऱ्याच्या नियोजनाकरिता विधान भवन, मुंबई येथे बैठकीकरिता बोलविल्यास कंपनीच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

१४. कंपनीच्या प्रतिनिधींनी मान्यवरांसमवेत सौहार्दपूर्ण वागणूक ठेवणे अपेक्षित आहे. दर्जाहीन व असमाधानकारक सेवा पुरविल्याचे अथवा नियमभंग झाल्याचे आढळल्यास कंपनीचे नाव नामिकेमधून वगळण्याचा अधिकार या सचिवालयाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

अर्ज सादर करण्याची पद्धत : इच्छुक टूर कंपन्यांनी आवश्यक त्या वैध कागदपत्रांसह त्यांचे अर्ज सिलबंद लिफाफ्यात **शुक्रवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०२६** रोजीपर्यंत खालील पत्त्यावर सादर करावेत.

पत्ता :

**सचिव-२,**
**राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा, आठवा मजला,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई.**